बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बीड शुक्रवार, दि.१८ऑक्टोबर २०२४ | वर्ष४रे | अंक७६वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## तटकरेंचं फेसबूक अकाउंट हॅक

मुंबई:निवडणूक आयोगाने महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या आहेत. राज्यात २० नोव्हेंबर रोजी एकाच टप्प्यात निवडणूक घेतली जाणार आहे. तर, २३ नोव्हेंबरला महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल लागणार आहे. त्यानंतर राज्यभर निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. पक्षांचे मेळावे, जाहीर सभा, प्रचारफेऱ्यांना सुरुवात झाली आहे. तसेच महायुती, महाविकास आघाडी व नव्यानेच होऊ घातलेल्या तिसऱ्या आघाडीत जागावाटपावर चर्चा चालू आहे. याबाबतच्या बातम्यांचा बातम्यांचा आपण या लाईव्ह ब्लॉगच्या माध्यमातून वेध घेणार आहोत. तसेच इतर राजकीय व सामाजिक बातम्यांवर आपलं लक्ष असेल.

# मनोज जरांगेंच्या निर्णयाने रथी-महारथींची फाटली !!

### आरक्षणचा निर्णय फडवणीस यांनी रद्द केला | विधानसभा निवडणूकीत उमेदवार करणार उभा!


### फडवणीस यांनी जाताना खुन्नस दिली

### निवडणूकीत अनेकांचा लागणार करेक्ट कार्यक्रम

जालना/पुण्यभूमी प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर तीव्र टीका केली असून भाजपला मोठा इशारा दिला आहे. त्यांनी मराठा समाजाचे स्वतंत्र उमेदवार उभे करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. विधानसभा निवडणुकीत त्यांच्या या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. आतापर्यंत अनेक नेत्यांनी जरांगे यांची भेट घेतली आहे.मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करताना भाजपला मोठा इशारा दिला. वेळ पडली तर मराठे त्यांच्या भाजपचा एन्काउंटर करणार, असं वक्तव्य मनोज जरांगे पाटील यांनी केलं आहे. अजून काही ठरले नाही. इच्छुक वाढले आहेत. चर्चा केली. आपल्याला ९५ टक्के समाजकरण आणि ५ टक्के राजकारण करायचे आहे. उमेदवारबद्दल चर्चा झाली. आपला बाप ( समाज ) २० तारखेला येणार आहे, आणि तो बाप निर्णय घेणार आहे. शेती, आरक्षण, दलित मुस्लिम, गोरगरीब ओबीसींच्या मुद्द्यावर चर्चा झाली. मी सर्वांचे मते जाणून घेतली. उद्या कोणीही बोलु नये की, आम्हाला मते मांडू दिली नाहीत. आजपर्यंत १८०० उमेदवारी अर्ज आले आहेत, आणि आज पुन्हा काही अर्ज आले आहेत, असं

पान २ वर...



### अनेक नेत्यांनी घेतली मनोज जरांगे यांची भेटे

मनोज जरांगे पाटील विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवार देण्याच्या तयारीत आहेत. लोकसभा निवडणुकीत मनोज जरांगे यांच्या भूमिकेमुळे सत्ताधारी पक्षांना मोठा तोटा सोसावा लागला होता. यानंतर आता विधानसभेत मनोज जरांगे हे स्वत: मराठा समाजाचे उमेदवार उभे करणार आहेत. त्यांच्या या भूमिकेमुळे अनेक राजकीय पक्षांना धडकी भरली आहे. त्यामुळे अनेक आजी-माजी आमदारांनी आतापर्यंत मनोज जरांगे यांची अंतरवली सराटीत जावून त्यांची भेट घेतली आहे.

विशेष म्हणजे नुकतंच माजी आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी जरांगे यांची भेट घेतल्याची माहिती समोर आली. त्यानंतर आज मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मनोज जरांगे यांची भेट घेतल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, अंतरवली सराटीमध्ये सध्या मनोज जरांगे पाटील हे ज्यांनी विधानसभा उमेदवारासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांशी चर्चा करत आहेत. या बैठकीला राज्यभरातून मोठ्या प्रमाणात उमेदवार उपस्थित झाले होते. या बैठकीसाठी आलेल्या गाड्यांची १० एकरच्यावर जागेत पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे.

# बिश्नोई टोळीमुळे भारत-कॅनडा वाद चिघळला

### देशविदेश:परराष्ट्र मंत्रालयाचे ट्रुडो सरकारवर मोठे आरोप



दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारत आणि कॅनडामध्ये गेल्या वर्षभरापासून तणावाचं वातावरण आहे. खलिस्तानी दहशतवादी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येमागे भारताचा हात असल्याचा आरोप कॅनडाने वर्षभरापूर्वी केला होता. त्यानंतर भारताने कॅनडाचे आरोप फेटाळून लावले होते. यातच कॅनडाने पुन्हा एकदा या प्रकरणाचा उल्लेख करत भारतीय उच्चायुक्त संजय कुमार वर्मा आणि इतरांचा या प्रकरणाच्या तपासात सहभाग असल्याचा आरोप केला, या आरोपानंतर भारताने एक पत्रक जारी करत कॅनडाने केलेले आरोप पूर्णपणे फेटाळून लावले. त्यापाठोपाठ आता भारताने कॅनडाच्या उच्चायुक्तांसह ६ राजनैतिक अधिकाऱ्यांना १९ ऑक्टोबर २०२४ पर्यंत भारत सोडण्याचे आदेश जारी केले आहेत. तसेच संजय वर्मा यांना परत मायदेशी बोलावले आहे. तसेच कॅनडातील इतर राजनैतिक अधिकाऱ्यांना मायदेशी बोलावलं आहे.भारत आणि कॅनडामधील राजनैतिक तणावादरम्यान संघटित गुन्हेगारीशी संबंधित प्रकरणं हाताळताना, अशा गुन्हेगारांबरोबरच्या कॅनडाच्या भूमिकांवर भारताने चिंता व्यक्त केली आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर

पान २ वर...

### भारताचं म्हणणं काय?

जयस्वाल म्हणाले, आम्ही वेगवेगळ्या प्रसिद्धी पत्रकांद्वारे आमची भूमिका स्पष्ट केली आहे. सप्टेंबर २०२३ पासून त्यांनी (ट्रुडो) आमच्यावर जे-जे आरोप केले. त्यापैकी एकाही आरोपाप्रकरणी ट्रुडो सरकार पुरावे सादर करू शकलेलं नाही. काल रात्री आम्ही पुन्हा एकदा आमची बाजू मांडणारं प्रसिद्धी पत्रक जारी केली आहे.

# अरवेर हमासचा म्होरक्या ठार


### दुजोरा: इस्त्रायल-हमास युद्धाला पूर्णविराम?

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेल्या वर्षभरापासून इस्त्रायल आणि हमासमध्ये घमासान युद्ध चालू आहे. या युद्धात चाळीस हजारांहून अधिकांचे प्राण गेलेत, तर लाखो लोक स्थालंतरित झाले आहेत. दरम्यान, आता हमासचा म्होरक्या याह्या सिनवार इस्त्रायलच्या हल्ल्यात ठार झाल्याची माहिती इस्त्रायची लष्करी सेना आयडीएफने दिली आहे. तसंच, इस्त्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनीही याबाबत दुजोरा दिला आहे.

७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने इस्त्रायल क्षेपणास्त्र डागून हल्ला केला होता. याह्या सिनवार हा या हल्ल्याचा मास्टरमाईंड होता. गेल्या काही दिवसांपासून इस्त्रायलने हमासविरोधातील हल्ले वाढवले होते. सातत्याने हवाई हल्ले केले जात आहे. आज, गुरुवारीही दक्षिण गाझा पट्टीतील रफाह शहरात इस्त्रायलने हल्ला केला. या हल्ल्यात तीन दहशतावाद्यांना लक्ष्य करण्यात आलं होतं. त्यापैकी एक याह्या सिनवार होता.इस्त्रायलने हवाई हल्ला केल्यानंतर तीन दहशतवादी ठार केल्याची माहिती सुरुवातीला दिली होती. परंतु, यात याह्या सिनवार मारला

पान २ वर...



### युद्ध संपलेलं नाही

याह्या सिनवार याच्या मृत्यूमुळे मध्यपूर्वेत आता शांतता प्रस्थापित होईल. परंतु गाझामधील युद्ध संपलेलं नाही. ओलिस इस्त्रायलमध्ये परत येत नाहीत, तोवर युद्ध सुरूच राहील, असा इशारा इस्त्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी दिला.

# माझं राजकीय अस्तित्व संपवण्याचा डाव

### धनंजय मुंडे:पुण्यातील विद्यार्थी संवाद मेळाव्यास तुफान प्रतिसाद

पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

मी ज्याच्यासोबत आहे त्याच्यासोबत इमानदारी दाखवली म्हणून माझं राजकीय अस्तित्व संपवण्याचा डाव आखला जातं आहे, माझ्या नशिबात संघर्ष पाचवीला पुजला आहे, त्यामुळे तुमच्या सहकार्याने आणि आशीर्वादाने मी कोणाला घाबरत नाही, तुम्ही साथ द्या, मी तुमच्यासोबत कायम राहील असे आवाहन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी पुणे येथे बोलताना केले.पुणे शहरातील बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित विद्यार्थी संवाद मेळाव्यात मुंडे बोलत होते. बीड जिल्ह्यातील आणि परळी मतदार संघातील विद्यार्थ्यांशी यावेळी मुंडे यांनी संवाद साधला. यावेळी बोलताना ते म्हणाले कि, या मेळाव्याला पंकजाताई मुंडे देखील येणार होत्या, पण त्या दिल्लीत आहेत, त्यांनी माझ्याजवळ शुभेच्छा संदेश दिला आहे. मी पुण्यात शिकलो असं सांगत मुंडे यांनी पुण्याचं अन माझं एक वेगळं नातं आहे असं म्हटलं.



यावेळी कॉलेज जीवनातील आणि मित्रांसोबतच्या अनेक आठवणींना उजाळा देत धनंजय मुंडे यांनी मी नेता नसून तुमचा देखील मित्रच आहे, असे समजा म्हणत उपस्थित तरुणांना साद दिली.माझ्या राजकीय प्रवासात मी अनेक संघर्ष पाहिले. रोज नव्या आव्हानांना तोंड देत मी इथपर्यंत पोहचलो आहे. राजकीय वाटचालीत मला अजितदादा पवार यांनी जी साथ दिली ती कधीही न विसरता येणारी आहे. मी दीड वर्षांपूर्वी त्यांच्यासोबत सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला. तेव्हापासून काही लोक मला संपवण्याची भाषा करू लागले आहेत.माझ्यावर खालच्या पातळीला जाऊन आरोप केले जातं आहेत, माझी जात, माझ्या कुटुंबाचे नाव अगदी माझी लायकी काढली जात आहे. एवढ्या मोठ्या माणसांनी असं बोलण योग्य नाही. पण मी कोणाला भीत नाही, घाबरत नाही. कारण तुमचा अन परळीकरांचा आशीर्वाद सोबत आहे. पुढच्या काळात बीड जिल्ह्याला विचारात घेतल्याशिवाय राज्याचं राजकारण पूर्ण होणार नाही. स्व. मुंडे साहेबांनी जिल्ह्याचे नाव देशात केलं, त्यांच्याच आशीर्वादाने मी माझ्या पद्धतीने जिल्ह्याचे नाव मोठं करण्याचा प्रयत्न करत आहे. तुम्ही सोबत रहा अन आशीर्वाद द्या असं

पान २ वर...

### चर्चेतले | १२०० कोटींच्या घोटाळा प्रकरणी सीबीआयकडून गुन्हा

# IPS भाग्यश्री नवटकेंचा पाय आणखी खोलात?

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

जळगावमधील भाईचंद हिराचंद रायसोनी (बीएचआर) पतसंस्थेतील गैरव्यवहार प्रकरणात संशयित आरोपी सुनील झंवर, तसेच कुणाल शाह यांनी पोलीस महासंचालकांकडे दिलेल्या तक्रार अर्जावरून पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेतील तत्कालीन पोलीस उपायुक्त भाग्यश्री नवटाके यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) सोपवण्यात आला आहे. त्यानंतर सीबीआयने याप्रकरणी मोठी कारवाई केली आहे. फसवणूक आणि गुन्हेगारी कट रचल्याप्रकरणी सीबीआयने नवटाकेंविरोधात गुन्हा दाखल केला आहे. नवटाके यांनी यांनी १,२०० कोटी रुपयांच्या कथित फसवणुकीच्या प्रकरणाचा तपास करणाऱ्या पथकाचं नेतृत्त्व केलं होतं. यात त्यांनी उचित कारवाई केली नसल्याचा त्यांच्यावर ठपका ठेवण्यात आला आहे. त्यांनी यामध्ये आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न केल्याचाही आरोप होत आहे.

नवटाके यांनी प्रचलित कार्यपद्धतीकडे दुर्लक्ष करून घाईगडबडीने, तसेच कोणता तरी हेतू ठेवून गुन्हे दाखल केले, असा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. याबाबत गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त निखिल पिंगळे यांनी बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, पोलीस उपायुक्त नवटाके यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर



### नवटक्केंना यापूर्वी दलितविरोधी वक्तव्य भोवलं होतं

बीड जिल्ह्यातील माजलगाव या ठिकाणी कार्यरत असताना महिला आयपीएस अधिकारी भाग्यश्री नवटक्के यांना दलित बांधवांबाबत वादग्रस्त वक्तव्य करणे भोवलं होतं. त्यानंतर त्यांची औरंगाबादला बदली करण्यात आली होती.

# माजी आ.पती अक्षय तुमच्या प्रतीष्ठानचे कॉलेज कुठे आहे?

### चर्चा: आजपर्यंत प्रतीष्ठानच्या नावाखाली सरकारला लुटले!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघाच्या माजी आमदार पती यांनी केज अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघाला वेड्यात काढले आहे कारण कुंबेफळ येथे अक्षय भैय्य मुंदडा यांच्या नावाने प्रतिष्ठान काढुन आज पर्यंत मतदार संघ लुटुन खाल्ला आहे या विषयी सविस्तर वृत्त असे की शासन महसूल व वन विभाग मुल्य मुंबई यांनी त्याचे संदर्भीय अक्षय मुंदडा सचिव अक्षय सेवा प्रष्वाण पुणे, यांना मौजे कुंबेफळ ता.केज जि. बीड येथील स.न. १७५ सभील ३८ ६० आर जमीन १३३८ २०/०८/०८नुसार श्री. एस. सी. नसिंग, फिजिओथेरपी, बिएम् एलटी या महाविद्यालयाना शैक्षणिक प्रयोजनासाठी अक्षय सेवा प्रतिष्ठाण पूणे या संस्थेस शासन निर्णय



महसूल व वन विभाग एलआरएफ १९९२/८७/७-दिनांक ३०/६/१९८२ मधील तरतूदीनुसार जमीन मुजूरीच्या आदेशाच्या दिनाकाच्या लगतपूर्व ५ वर्ष आधिच्या वर्षाच्या १ जानेवरी रोजी असलेल्या बाजारमूल्याच्या २५ टक्के किमत आकारावयाचे ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे. सदर जमीनीची सन २००८ची शिवगणकानुसार होणारी बाजारभावाची कब्जेहक्काची किमतरुपये १९८०००रपये अक्षरी एक लाख आठ्यानो हजार रुपये आहे त्याचे २५ टक्के रक्कम रुपये ४९५०० अकरी एकोनपन्नास हजार पाचशे रुपये वसूल करून महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीची विल्हेवाट) नियम १९७८नियम ६ मधील तसेच शासन महसूल व वन विभाग निर्णय क्र. मुलभारएक १०८३/७११३४/प्र.क्र.३४७८/ग-६दिनांक ८/२/१९८३वशासन महसूल व वन विभाग निर्णय क. एलआरएएफ १०००/प्र. क्र .८५/ज-१. दिनाक २०/७/१९९२ मधील अटी शर्तीवर तसंच इतर अटीवर मंजूर करण्यास मान्यता दिलेली आहे. श्री अक्षय मुंदडा सचित अक्षरा सेवा प्रतिषाण

पान २ वर...

## पुरेसा वेळ मिळेल...

सत्ताधाऱ्यांस विविध जनकल्याण योजना जाहीर करण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल याची खातरजमा करून, विविध घोषणांचा बार वेळेत उडेल याची पुरेशी दक्षता घेऊन, पंतप्रधानादी मान्यवरांचे दौरे यथासांग पार पडतील हे पाहून महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका जाहीर होतील, असे म्हटले जात होते. निवडणूक आयोगाने आपल्या कृतीने हा अंदाज रास्त ठरवला. अखेर निवडणुकीची घोषणा झाली. त्यामुळे बाकी कोणी नाही तरी निदान ज्यांच्यावर राज्य सरकारच्या तिजोरीची जबाबदारी आहे, त्यांनी तरी सुटकेचा निःश्वास सोडला असेल. गेले काही दिवस संबंधित खात्याच्या कर्मचाऱ्यांस अहोरात्र काम करावे लागले असणार. राज्याचे नेतृत्व अनेकानेक कल्पक योजनांची खैरात करण्यात मशगूल असल्यामुळे अंतिमत: तिजोरीत किती वेगाने खडखडाट होईल, याचा जमाखर्च या अधिकाऱ्यांस सातत्याने करावा लागला असणार. गेले काही आठवडे सरकारातील प्रत्येकाच्या हातात जणू द्रौपदीच्या थाळ्याच थाळ्या असाव्यात असा भास व्हावा अशी परिस्थिती होती. जो जे वांछिल आणि न वांछिल तरीही त्यास ते ते मिळत होते. ही निवडणुकीची ताकद. जनसामान्यांचा 'एक देश एक निवडणूक' या संकल्पनेस विरोध असेल तो यासाठी. वारंवार निवडणुका म्हणजे वारंवार खैरात. ही मौज पाच वर्षांत एकदाच निवडणुका झाल्यास बंद होईल. वारंवार निवडणुका म्हणजे वारंवार पंतप्रधानादी महोदय येणार. म्हणजे वारंवार खड्डे बुजवले जाणार, साफसफाई होणार आणि स्वच्छ भारताचा प्रत्यय येणार. तेव्हा जनतेचे खरे हित 'एक देश अनेक निवडणुका' यातच आहे, यात संदेह नाही. असो. आता महाराष्ट्रात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांविषयी काही.यातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे युती असो वा आघाडी; दोघांसही आपला मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण हे सांगण्यास होत असलेली अडचण. सत्ताधारी असल्यामुळे यात जरा अधिक गोची आहे ती युतीची. खरे तर त्यांच्याकडे मुख्यमंत्री आहेत. 'लाडकी बहीण'सारख्या चमकदार योजनांची राखी मतदारांच्या मनगटावर त्यामुळे तर बांधली गेली. पण तरीही निवडणुकांनंतर एकनाथराव शिंदेच आमचे मुख्यमंत्री असतील असे ना खुद्द त्यांची शिवसेना म्हणते ना त्यांना मुख्यमंत्री करणारा भाजप म्हणतो. हे असे अजितदादांची राष्ट्रवादी म्हणाली नाही तर एकवेळ समजून घेता येईल. अजितदादांस 'अखंड उपमुख्यमंत्री भव' हा आशीर्वाद ज्याने कोणी दिला त्याची पुण्याई जबरदस्त असणार. ती संपायला तयार नाही. असे असताना 'आमचे मुख्यमंत्री एकनाथराव' हे अजितदादा कसे काय म्हणणार? परत स्वत: एकनाथरावही तसे जाहीरपणे म्हणण्यास अनमान करताना दिसतात. त्यामुळे रात्रंदिवस राब राब राबणारा, तगडा मुख्यमंत्री असूनही एकनाथरावांचे नाव कोणी घेण्यास तयार नाही. देवेंद्र फडणवीसच आमचे मुख्यमंत्री असतील, असे भाजपमध्येही कोणीही छातीठोकपणे सांगायला तयार नाही. आता हे असे वास्तव असल्याने प्रवास सुरू झाल्यानंतरची परिस्थिती काय असेल याची कल्पनाही करवत नाही. गेल्या पाच वर्षांत या राज्याने जी अनुभवली तशी राजकीय साठमारी अन्य कोणत्या प्रांताने क्वचितच अनुभवली असेल. लैंगिक अत्याचार, खून अशा आरोपांसाठी आधीच्या सरकारातून बाहेर पडावे लागलेली व्यक्ती पुन्हा मंत्रीपदावर नेमली जाते आणि तेव्हा तिच्या विरोधात आंदोलन करणारे आणि करणाऱ्या 'लाडकी बहीण' बनून सरकारात खांद्याला खांदा लावून बसतात. आधीच्या सरकारात महत्त्वाच्या पदांवर होते तेच आताच्या सरकारात तशाच महत्त्वाच्या पदांवर बसून 'तेव्हा' काही काम कसे झाले नाही, हे जनतेस सांगतात. हे असे सांगणारे आधीच्या सरकारातून निष्क्रियतेचे कारण सांगून बाहेर पडले म्हणावे तर तसेही नाही. पुढच्या अन्य कोणा सरकारात वर्णी लागल्यास आताच्या सरकारबाबत ही मंडळी नंतर तेच बोलणार नाहीत, याचीही हमी नाही. राज्यासमोरील खरी आर्थिक आव्हाने, बेरोजगारी, शिक्षणाचा ढासळता दर्जा इत्यादी मुद्दे या निवडणुकीच्या गावी जाणाऱ्यांच्याकडे तोंडी लावण्यापुरतेही नाहीत. राज्याचा इतका रुंद आणि खोल सामाजिक, सांस्कृतिक आणि अर्थातच राजकीय दुभंग या महाराष्ट्राने आता इतका कधी अनुभवलेला नसेल.तो कमी व्हावा, ही दरी बुजावी अशी इच्छा असेल तर या राज्यातील सुजाणांस डोळे उघडे ठेवून आणि डोके जागेवर ठेवून मतदान करावे लागेल. निवडणुकांची घोषणा अश्विनी पौर्णिमेच्या पूर्वसंध्येस झाली. तथापि सध्याच्या पावसामुळे अनेकांचा चंद्र झाकोळलेला राहील. हा झाकोळ दूर करण्याची जबाबदारी मतदारांची. त्यासाठी 'कोण जागे आहे' हा कोजागरीचा प्रश्न स्वत:लाच विचारावा लागेल

# बीडमध्ये जगातील अव्वल फ्रीस्टाईल फुटबॉलपटू जेमी नाईटची कार्यशाळा

## उपक्रम: पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांना मिळाली प्रेरणा






बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड येथील पोदार इंटरनॅशनल स्कूल येथेटॉप फुटबॉल फ्रीस्टायलर जेमी नाईट यांनी गुरुवारी भेट दिली. त्यांची विविध कौशल्ये दाखवली आणि पोदार एज्युकेशन नेटवर्कच्या क्रीडा उपक्रमाचा भाग म्हणून कार्यशाळांद्वारे विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली.तसेच माध्यम प्रतिनिधीशी संवाद देखील साधला.

जेमी नाईट यांनी विद्यार्थ्यांच्या फुटबॉलवरील उत्साहाचे कौतुक केले, भारताला या क्रीडेत जागतिक स्तरावर खेळाडू बनण्याची क्षमता असल्याचे सांगितले. पोदार एज्युकेशन नेटवर्क अशा आंतरराष्ट्रीय कार्यशाळांद्वारे सर्वांगीण शिक्षण देण्याचे उद्दिष्ट ठेवते, ज्यामुळे विद्यार्थ्यांना जीवन कौशल्ये विकसित करता येतील आणि भविष्यात भारताचे जागतिक स्तरावर प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळू शकेल. अशी भावना जेमी नाईट यांनी व्यक्त केली.

पोदार इंटरनॅशनल स्कूल बीड तर्फे जगातील टॉप टेन फुटबॉल फ्रीस्टाईलर पैकी एक जेमी नाईट यांना शाळेत निमंत्रित करण्यात आले होते. जेमी नाईट यांच्या नावे अनेक गिनीज बुक विक्रम आहेत, त्यांनी बीड प्रथमच भेट दिली. जेमी जगातील सर्वात अनुभवी आणि सर्वाधिक मागणी असलेल्या व्यावसायिक फुटबॉल फ्रीस्टाइलर्सपैकी एक आहे.त्याने जगभरात प्रवास केला आहे. जेमीच्या अनन्य साधारण कृतींमुळे विद्यार्थी मंत्रमुग्ध झाले होते. यावेळी बोलताना जेमी नाईट म्हणाले, पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांमध्ये खेळाबद्दल इतका उत्साह, प्रतिभा आणि आवड आहे हे पाहून खूप आनंद झाला. भारत फुटबॉल खेळात जागतिक खेळाडू बनू शकतो आणि कदाचित फुटबॉल विश्वचषकात लवकरच भाग घेईल अशी मी अशा बाळगतो.पोदार एज्युकेशन नेटवर्कचे संचालक श्री हर्ष पोदार यांनी विद्यार्थ्यांच्या उर्जा आणि उत्कटतेबद्दल आनंद व्यक्त केला. जेमी ने आयोजित केलेल्या या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना आपल्या ध्येयाविषयी फोकस ठेवणे महत्वाचे आहे हे लक्षात आले.ग्रेड्सपेक्षा जास्त या आमच्या विश्वासावर ठाम राहून, आमच्या विद्यार्थ्यांनी अशा कार्यशाळेतून शिकलेल्या गोष्टींचे अनुकरण करावे असे श्री हर्ष पोदार म्हणाले.यावेळी प्राचार्य गणेश काकडे,उप प्राचार्य वर्षा नागदे, स्पोर्ट्स डायरेक्टर ज्योती गाला, जनरल मॅनेजर अतुल घरात, प्रशासकीय अधिकारी चेतन गुंजकर यांची उपस्थिती होती.

### पोदार एज्युकेशन नेटवर्क बद्दल थोडेसे

पोदार एज्युकेशन नेटवर्कची स्थापना शेठ आनंदीलाल पोदार यांनी १९२७ मध्ये केली होती, अगदी सुरुवातीपासूनच, प्रामाणिकपणा, सचोटी आणि सेवा या पारंपारिक भारतीय मूल्यांवर लक्ष केंद्रित केले आणि प्रेरित केले गेले. राष्ट्रपिता महात्मा गांधी हे आनंदीलाल पोदार ट्रस्टचे पहिले अध्यक्ष म्हणून या बांधिलकीची साक्ष देतात. शिक्षण क्षेत्रातील ९७ वर्षांहून अधिक अनुभवांसह, पोदार एज्युकेशन नेटवर्क आता १४९ पोदार इंटरनॅशनल स्कूल्सचे नेटवर्क आहे, जे २,५०,००० पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या असलेल्या पोदार एज्युकेशन नेटवर्कद्वारे पूर्णपणे व्यवस्थापित केले जाते.

# मतदार संघ न सोडण्याच्या सूचना

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

उमेदवारीची कोणतीही काळजी करू नका,कामाला लागा व एकही दिवस सिल्लोड-सोयगाव मतदार संघ सोडू नका असे आश्वासन गुरुवारी सोयगाव चे रंगनाथ काळे यांना पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी मुंबईत दिले त्यामुळे आता सिल्लोड-सोयगाव मधून महाविकास आघाडी कडुन राष्ट्रवादी काँग्रेसचे(शरद पवार गट) यांना ग्रीन सिग्नल दिला आहे जेष्ठनेते रंगनाथ काळे हे मुंबईत ठाण मांडून असून त्यांनी बुधवार (ता.१७) दुपारी तीन वाजता खासदार सुप्रिया सुळे यांची भेट घेत तीन तास चर्चा रंगली या चर्चेत जेष्ठनेते रंगनाथ काळे यांना पक्षाकडून ग्रीन सिग्नल मिळाला आहे त्यामुळे सोयगाव शहरात राजकीय गोटात खळबळ उडाली आहे त्यामुळे १९९५ नंतर पुन्हा एकदा अब्दुल सत्तार व रंगनाथ काळे यांच्यात सिल्लोड-सोयगाव मतदार संघात लढत पहावयास मिळेल असे राजकीय चित्र सध्या तरी आहे



सोयगावचे जेष्ठनेते रंगनाथ काळे हे राष्ट्रवादी काँग्रेस(शरद पवार) गटाकडून इच्छुक आहे दुसऱ्या एका बाजूने उध्दव ठाकरे गट शिवसेनेचे संपर्कात सुरेश बनकर,विठ्ठल बदर असून सिल्लोड-सोयगाव मधून महाविकास आघाडी च्या उमेदवारांवर शिक्कामोर्तब होत नसल्याने सिल्लोड-सोयगाव चे चित्र अस्पष्ट आहे दरम्यान एकनाथ शिंदे गट शिवसेनेचे विद्यमान मंत्री अब्दुल सत्तार हे बाशिंग बांधून आहे तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे(शरद पवार) गट रंगनाथ काळे हे पूर्वतयारीने आहे त्यामुळे सोयगाव चा स्थानिक उमेदवार विधानसभा निवडणुकीत मिळाल्यास प्रभाव राहील असे राजकीय जाणकार म्हणतात सुप्रिया सुळे यांच्या भेटीत रंगनाथ काळे यांच्या सोबत हरिश्चंद्र लघाने, द्वारकदास पाथरीकर, विलास काबरा ज्ञानेश्वर कापसे आदी होते.

# काकू-नाना प्रतिष्ठानला गोरगरिबांच्या आरोग्य सेवेचे आशीर्वाद

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

लोकनेते माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून सुरू झालेले महाआरोग्य शिबिर गावा-गावातील गोरगरिबांच्या आरोग्याची सेवा निरंतर करत आहे. प्रामुख्याने या शिबिराचा फायदा वृद्धांना होताना दिसून येत आहे.



बुधवार दिनांक १६ ऑक्टोबर रोजी वांगी येथे मोफत सामुदायिक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास वांगी येथील गावकर्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जवळपास ११५ रुग्णांनी आपल्या आरोग्याची मोफत तपासणी करून होमिओपॅथीची औषधी घेतली.

आदर्श शिक्षण संस्थेचे सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय सलग्नित महात्मा गांधी रुग्णालय व द्वारा फिरता दवाखाना मोफत सामुदायिक आरोग्य शिबिराचा उपक्रम गेली ९० दिवसांपासून नियमितपणे राबवले जात आहे. हे शिबिर काकू-नाना प्रतिष्ठानचे सचिव तथा सल्लागार डॉ.अरुण भस्मे, आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासन अधिकारी राजा मचाले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेंद्र गौशाल, उपप्राचार्य डॉ.गणेश पांगारकर, डॉ.अंजली पांगरकर यांचे मार्गदर्शनाखाली तसेच डॉ. अंजली क्षीरसागर, डॉ.अमृता आगवान यांच्या समन्वयाने यशस्वी राबवले.

## पान सहा वरून

**मनोज जरांगेंच्या निर्णयाने**

मनोज जरांगे यांनी सांगितलं.ही लाट देवेंद्र फडणीस यांचा कार्यक्रम लावणार आहे. या मनस्थितीमध्ये फडणवीस यांनी जायला भाग पाडले. जो समाज त्यांच्या बाजूने होता त्यांची मुडदे फडवणीस यांनी पाडली. देशातील सर्वात डागी माणूस, आणि देशात पहिला आहे. न्यायाची अपेक्षा फडवणीस यांच्याकडून होती, पण त्यांनी विष आमच्या नारड्यात ओतले. फडवणीस यांनी जाताना खुन्नस दिली आणि मला मराठ्यांशी काही देणेघेणे नाही हे दाखवले. धनगर आरक्षणचा निर्णय फडवणीस यांनी घेतला आणि त्यांनी रद्द केला. वेळ पडली तर मराठे त्यांच्या भाजपचा एन्काउंटर करणार, असा घणाघात मनोज जरांगे यांनी केला.

**बिश्नोई टोळीमुळे भारत-कॅनडा**

जयस्वाल यांनी गुरुवारी कॅनडावर गंभीर आरोप केला की भारतातील गुन्हेगारांची कुख्यात टोळी लॉरेन्स बिश्नोई टोळीतील गुन्हेगारांचे प्रत्यार्पण करण्यास कॅनडा सरकार तयार नाही. बिश्नोई टोळीतील अनेक गुन्हेगार कॅनडामधील गुन्ह्यांच्या प्रकरणात सामील आहेत. परराष्ट्र मंत्रालयाने सांगितलं की कॅनडातील बिश्नोई टोळीतील अनेक सदस्यांच्या प्रत्यार्पणासाठी आम्ही कॅनडा सरकारशी अनेकदा बातचीत केली आहे. या गुन्हेगारांना भारताकडे सोपवावं अशी मागणी आम्ही सातत्याने करत आहोत. प्रतार्पणाच्या २६ विनंत्या गेल्या दशकभरापासून प्रलंबित आहेत. आम्हाला हे सांगायला खूप विचित्र वाटतंय की आम्ही ज्या गुन्हेगारांना कॅनडातून हद्दपार करण्यास सांगितलं होतं, त्यांच्यावर तिथल्या सरकारने कोणतीही कारवाई केली नाही. मात्र, आता त्या गुन्हेगारांनी कॅनडात उच्छाद मांडला आहे. ते आता तिथे गुन्हे करत आहे आणि कॅनडा सरकार त्यासाठी भारताला दोषी ठरवत आहे.

**अखेर हमासचा म्होरक्या**

गेला की नाही, याबाबत कोणतीच अधिकृत माहिती समोर आली नव्हती. सुरुवातीला इस्रायलच्या लष्कराने म्हटलं होतं की, आम्ही हमासच्या तीन दहशतवाद्यांना लक्ष्य केलं होतं. त्यापैकी एक हमासचा म्होरक्या याह्या सिनवार ( क्यारी लहळशष धरहूर ङ्ळपुरी ) असू शकतो. सध्या कुठले दहशतवादी मारले गेले आहेत त्यासंदर्भातली ओळख पटलेली नाही. मात्र शक्यता आहे की हमासचा म्होरक्या याह्या सिनावरचा यामध्ये मृत्यू झाला.दरम्यान काही वेळाने आयडीएफनेच याबाबत दुजोरा दिला. याह्या सिनवार मारला गेला, असं आयडीएफने सांगितलं. तसंच, ७ ऑक्टोबरच्या नरसंहार आणि अत्याचाराला जबाबदार असलेला खूनी याह्या सिनवारला आज खऊऋ सैनिकांनी ठार मारले, असं इस्रायलचे परराष्ट्र मंत्री कॅटझ यांनी एका निवेदनात म्हटले.

**माझं राजकीय अस्तित्व**

म्हणत मुंडे यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. यावेळी बालगंधर्व रंगमंदिर तरुणाईने हाऊसफुल्ल झालेले पाहायला मिळाले.व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष दीपक मानकर, समीर चांदेरे, अजय मुंडे, महादेव डोईफोडे, राजपाल लोमटे, विठ्ठल सानप, अविनाश नाईकवाडे यांसह आदी मान्यवर उपस्थित होते.

**IPS भाग्यश्री नवटाकेंचा**

या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवण्यात आला. याबाबतच्या प्रस्तावास मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिल्यानंतर बंडगार्डन पोलीस ठाण्यात दाखल असलेला गुन्हा सीबीआयकडे तपासासाठी सोपवण्यात आला असून आता सीबीआयने नवटाके यांच्याविरोधात पुरावे गोळा करण्यास सुरुवात केली आहे.याप्रकरणी, पुणे जिल्ह्यातील तीन पोलीस ठाण्यांत नोव्हेंबर २०२० मध्ये गुन्हे दाखल झाले होते. त्या अनुषंगाने सुनील झंवर आणि कुणाल शाह यांनी पोलीस महासंचालकांकडे तक्रार अर्ज दिला होता. या तक्रार अर्जाची पोलीस महासंचालक कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी केली. त्यानंतर १९ फेब्रुवारी २०२४ रोजी पोलीस महासंचालकांकडून याबाबतचा चौकशी अहवाल गृह विभागाकडे पाठवण्यात आला होता. त्यानंतर मुख्यमंत्री कार्यालयाच्या आदेशांनंतर आता हे प्रकरण सीबीआयकडे सोपवण्यात आलं आहे.

**माजी आ.पती अक्षय तुमच्या**

पुणे यांना सह जिल्हा निबंधक वर्ग १ बीड यानी सदरील जमीनीचे बाजार मावांची किंमत रुपये १९८०० (अक्षरीएकलास आठयानो हजार फक्त) कळविलेली रक्कमपैकी २५ टक्के रक्कम रुपगे ४८५०० अक्षरी एकोनपन्नास हजार पाचशे रुपये फक्त किंमत दिनांक ५/८/२००८रोजी चलनने बँकेत जमा करून मूळ चलन सादर केले आहे. महाराष्ट्र जमीन महसूल (शासकीय जमीनीची विल्हेवाट लावी) नियम १९७१नियम ५५ शानाच्या संदर्भ क्र.५ मधीत ज्ञापनानुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा चापर करुन जिल्हाधिकारी बीक है रुपये ४९५०० एकोनपक्षास हजार पाथशे रुपये फक्त) शासकीय गायरान जमीन स. न. १०.७मी कुंभेफळ ता.केज जि. बीड मधून उसेक्टर ६० आर जमीन सचिव श्री अक्षय मुंदडा सचिव अक्षय सेवा प्रतिष्ठाण पुणे यांना शैक्षणिक प्रयोजनांतर्गत बी. एस. सी. नर्सिंग, फिजिओथेरपी, डिएमएलटी या महाविद्यालयांना शैक्षणिक प्रयोजनासाठी खालील अटीवर मंजूर करून हस्तांतरण करण्याचे आदेशीत करित आहे. खालील बतूः सिमा प्रमाणे चतुः सिमा पूर्वेस १५०मधील उर्वरित जागा पश्चिमेस कु फिळ-बनेगाव रस्ता दक्षिणेस १५७ नबील जमीन उत्तरेस स.न. ३४ मधील खालेदार रमेश पारवे इतर,विना अनुदानीत संस्थेला जमीन वाटपात्र धारण शासनाच्या विचाराधीन असल्यामूळे भविष्यात होणा-या सुधारीत जमीन बादपाव्या धोरणाप्रमाणे किमत वाडीत झाल्यास होणा-या किमतीतील फरक व्याजासह सस्था दईल तसेच त्यावेळी असणा-या आवश्यक अटी व शर्ती सस्थेवर बंधनकारक राहतील अशा अशयाचे लेखी हमी शवयात विहित पावतीने सस्था जिल्हाधिकारी बीड शासनास नतरच शैक्षणिवा प्रयोजनार्थ जगीनीचा ताबा संस्थेस देण्यात येईल. देऊ सप्जूर करण्यात आलेल्या जमीनीवर गांधकाम करताना विकास करताना नियोजन प्राधिकाक-याची /स्थानिक प्राधिकरणाची पूर्व मंजूरी घेण्यात याची , संस्था जोपर्यंत शैक्षणिक प्रयोजनार्थ शासकीय अटी व शर्तीनुसार शासकीय जमीन वापरेल ही पर्यंत जमीन संस्थेकडे राहील शैक्षणिक प्रयोजन बंद केल्यास संस्था शासनाची जमीन शासनास परत करेल व संस्था मोबदला मागणार नाही. तसेच वाणिज्य प्रयोजनार्थ जमीन वापरता येणार नाही,नियमाप्रमाणे क्रीडांगणासाठी जागा राखून ठेवणे आवश्यक असून महाराष्ट्र जमीन महसूल (सपज.दि) नियम १९७१ च्या नियम ७ नुसार पटटयाने देण्यात यामी क्रिडांगणामूळे बांधकामात बदल संभवल्यास सक्षम प्राधिकरणाची मजूरी घेऊन माधकाम करण्यात याये, या सदर बांधकामाची सुख्या तीन वर्षाच्या आत सूरु करण्यात यावी५ ठराविक अंतराबर झाडे लावणे बधनवारक असून संस्थेने त्याची

जमीनीखालील खनिज संपत्तीबर शासनाचा हक्या असेल. सार्वजनिक सुविधा वा अपरिहार्य करणास्तव शासन जमीन जमीनीचे भाग ताब्यात घेऊ शकते मोबदला नियमाप्रमाणे असैल सस्थेला जागा ज्या प्रयोजनासाठी मजूर करण्यात आली आहे त्याचः प्रयोजनासाठी जागेचा वापर करण्यात यावा.प्रस्तावित जागेवर जाण्यासाठी अस्तित्वातील पीच रस्त्यापासून संदर्भित जमीनीपर्यंत येणारा पोच रस्ता संस्थेने विकसित करणे बंधनकारक राहील. मौजे कुबेपाळ येथील ग्रामपंचायत ग्रामसभाना स्थानिक विकासात्नक कामार्थ आग्यासने संस्थेने दिली असल्यास त्याची पूर्तता संस्थेने करावी , मंजूर आदेशातील अटीचा भंग झाल्या। सदर जमीन बाधकामासह सरकार जभा करण्यास पात्र राहील व संस्थेस कोणताही बदला मागण्याचा हक्क राहणार नाही. वेळोवेळी शासन के आदेश / निवेश देल त्याचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक असेल श्री अक्षय मुंदखा सचिग अक्षय सेया प्रतिष्ठाण पुणे थाना ज्या प्रयोजनासाठी जमीन मंजूर करण्यात आली आहे. त्याचा वापर त्याच कारणासाठी केला पाहीजे. त्या जमीनीचे हस्तांतरण विक्री किया लीजवर खाजगी व्यक्तीस अथवा अन्य खात्यास जिल्हाधिकारी वार्थ पूर्व परवानगी शिवाय देता येणार नाही,उपरांत जमीनीची त्या खात्यास आवश्यकता नसेल तेव्हा ती महसूल खात्यास (शासनास परत करावी लागेल व त्या जमीनीची विल्हेवाट महाराष्ट्र जमीन महसूल अयन १९६६ व ल्या खालील नियमानुसार करण्यात येईल १४ सस्था जमीन भोगवटादार वर्ग-२ म्हणून नवीन शतींगर आरण करेल व जमीन अथवा तिचा कोणताही भाग जासनाचे पूर्व मंजूरीशिवाय गहाण अथवा विक्री अथवा हस्तातरीत करता येणार नाही , जगीनीचा ताबा दिल्याच्या विनाकापासून यश्यक ते बांधकाम दोन जाल पूर्ण जरणे बंधनकारक राहील मजूर हमीलीच्या क्षेत्रापैकी १० टक्के क्षेआवर वृक्ष लागवड करुन त्याची जौंगसना करणे बंधनकारक राहीला अटीचे उल्लंघन काल्याचं निवर्शनास आल्यास तो शर्तभग समजून कार्यवाही केली जाईल १७समधीत संस्थोस नमूना एक निगममधील सातील सर्व अटी लागू राहतील असे म्हटले गेले आहे तर अक्षय मुंदडा एवढा मोठा प्रोजेक्ट कुठे आहे काय केले या प्रोजेक्टचे जनतेला उत्तर द्यावे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अ‍ॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# जगाला बौद्ध विचारांची गरज!

**धम्मदेसना** — वर्षावास समारोप निमित्त खीर वाटप

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जीर्ण झालेल्या प्रकृतीचा विचार न करता आम्हाला दिलेल्या बौद्ध धम्माच्या मार्गदर्शनासाठी आणि पुढील विकासासाठी बुद्ध आणि त्यांचा धम्म हा धम्म ग्रंथ लिहून ठेवला. त्याच धम्मग्रंथाला प्रमाण म्हणून अजिंठा बुद्ध विहार, हाउसिंग कॉलनी, धानोरा रोड, बीड येथे आषाढ पौर्णिमा पासून बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ वाचनाला सुरुवात झाली.

अजिंठा बुद्ध विहार येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अखिल भारतातील तमाम बौद्धांची धम्म कार्य करणारी एकमेव संस्था भारतीय बौद्ध महासभा आणि हाउसिंग कॉलनी येथील धम्म ज्योती महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम आयोजित केला जातो.

बीड जिल्ह्यामध्ये हाउसिंग कॉलनी विभागात मोठ्या प्रमाणावर बुद्धाच्या धम्मा कार्य होत असते, यावेळी भारतीय बौद्ध महासभेच्या महिला जिल्हाध्यक्ष अरुणाताई निसर्गन, अवंतिका ताई वासनिक, सरस्वती ताई जाधव, शोभाताई साळवी, मायादेवी पारवे ताई, निलावती ताई साळवे, सुस्मिता डोंगरे ताई, कांता ताई जाधव, संजीवनी ताई गडगे, जनाबाई कांबळे, प्रमिलाताई भोसले, वर्षाताई कांबळे, राजश्री ताई घोडके, भालेराव आजी, सुशीला ताई कांबळे, रत्नमाला ताई चांदमारे, कांताबाई कांडेकर महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.



भारतीय बौद्ध महासभेच्या महिला शाखेने गेल्या ४० वर्षापासून सदरील अजिंठा बुद्ध विहार येथे धम्मग्रंथ वाचनाची परंपरा अविरत कायम ठेवलेले आहे.यावेळी शहर अध्यक्ष एडवोकेट केतन गायकवाड यांनी बाबासाहेबांनी लिहिलेला धम्मग्रंथ आणि २२ प्रतिज्ञांचे महत्त्व समजून सांगितले. तसेच या कार्यक्रमाला उपस्थित असलेले भारतीय बौद्ध महासभेचे संदेश जी डोळस यांनी सुद्धा बुद्धाचा धम्म आणि आधुनिक जग या विषयावर आपले मत मांडले.

भारतीय बौद्ध महासभेचे शहराचे पदाधिकारी एडवोकेट तेजस वडमारे यांनी सुद्धा बुद्ध आणि त्यांचा धम्म याविषयी अभ्यासपूर्व मार्गदर्शन केले. उपस्थित तालुक्याचे खेमाडे सरांनी आपले मत मांडले. महिला पदाधिकाऱ्यांमध्ये जिल्हाध्यक्ष अरुणाताई निसर्गन तसेच माया देवी पारवे, शोभाताई साळवी, कांताबाई जाधव, सरस्वती ताई जाधव यांनी सुद्धा आपले अनुभव आणि समाजातील बौद्ध धर्माचे वाटचाल यावर सखोल मार्गदर्शन केले.

## आदर्श आचारसंहितासाठी सात पथके

सतर्क:निवडणूक निर्णय अधिकारी मनीषा मेनेंची माहिती



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सिल्लोड-सोयगाव मतदार संघासाठी सोयगाव तालुक्यातील ६८ गावांच्या समावेश आहे यासाठी सोयगाव तालुक्यात सात आचारसंहिता बैठे पथकांची नियुक्त करण्यात आल्या ची माहिती सहायक निवडणूक निर्णय अधिकारी मनीषा मेने यांनी बुधवार (दि.१७) दिली आहे दरम्यान शहरासह मतदार संघातील ६८ गावात आचार संहितेचा काटेकोर पणे पालन करण्याचे निर्देश मनीषा मेने यांनी दिले त्यासाठी बुधवारी पहाटे पासून शहरातील सर्व राजकिय फ्लेक्स,बॅनर काढण्यात आली आहे तसेच संबंधित ग्रामपंचायतींना व नगर पंचायत ने हे बॅनर व फ्लेक्स खाली उतरवून जमा केले आहे ग्रामीण भागातील राजकीय पक्षाचे बोर्ड, विविध संघटनेचे फलक फ्लेक्स काढण्याची कारवाई करण्यात आली आहे

चौकट-तालुक्यातून पर जिल्ह्यात जाणाऱ्या मार्गावर ही आचारसंहितेच्या बैठे पथक तैनात करण्यात आली असून जळगाव, बुलढाणा, छत्रपती संभाजीनगर,धुळे, चाळीसगांव, पाचोऱ्या कडे जाणाऱ्या मार्गावर ही बैठे पथक २४ तास नियुक्त राहतील असे मनीषा मेने यांनी सांगितले.



**परळी:** धनंजय मुंडे एका कार्यक्रमानिमित्त आळंदी देवाची येथे आले असता, त्यांनी संत ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधीचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले.

## किरण नरवडेचा प्रथम क्रमांक

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी



महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक अंतर्गत घेण्यात आलेल्या परीक्षेत माजलगाव ची कन्या किरण नरवडे हिने ७४.३५% घेऊन प्रथम क्रमांक पाट विल्याबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे

महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान पीठ अंतर्गत घेण्यात आलेल्या परीक्षेत कोल्हापूर सांगली परिसरात जास्त चा निकाल लागला असला तरी माजलगाव चि कन्या किरण नरवडे हिने ७४.३५% मार्क घेऊन प्रथम क्रमांक पटकावला यामुळे बीड जिल्ह्यासह माजलगाव तालुक्याचे मान उंचावली गेली असल्यामुळे तिचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे किरण नरवडे हिचे शिक्षक वृंद नरवडे घाराण्याशी नातं असलेल्या लोकांनी अभिनंदन व्यक्त करून शुभेच्छा दिल्या

## अनुदानित शाळांना संच मान्यता द्यावी

पाठपुरावा:शाळा कृती समितीची मागणी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी



मागील काही दिवसांपुर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सरकारने घेतलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये राज्यातील अंशतः अनुदानित शाळांना २० टक्के टप्पा वाढ देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. सोमवार दि.१४ रोजी त्यासंबंधीचा शासन आदेश सुद्धा शासनाने काढला आहे. हे अनुदान वितरित करताना शासनाने शैक्षणिक वर्ष सन २०२४- २५ ची संच मान्यता लागू केली. त्यामुळे या सर्व शाळांना वाढीव टप्पा अनुदान मिळवण्यासाठी शैक्षणिक वर्ष सन २०२४ -२५ ची संच मान्यता असणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊन प्रशासनाने शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ ची संच मान्यता डिसेंबर पूर्वी जनरेट करून वितरित करावी

अशी मागणी बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने माध्यमिक आणि प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिका-यांना दिलेल्या निवेदनाद्वारे विनाअनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष वैजनाथ चाटे, छत्रपती संभाजीनगरचे कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे,छत्रपती संभाजी नगरचे निरीक्षक विजयसिंह शिंदे, बीड जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ, जेष्ठ मार्गदर्शक बापुराव घुलेबाळासाहेब सानप, नामदेव मुंडे प्रल्हाद कुलकर्णी, सुरेश कदम,राजेश गदळे यांनी केली. यावेळी शाळा कृती समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बीडमध्ये एकजुटीने प्रचार करु

बीड /पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड महाराष्ट्रामध्ये विधान सभा निवडणुकीचा बिगुल वाजला आहे.महाराष्ट्रात तीन प्रमुख पक्ष आय काँग्रेस,राशप,व उद्धव ठाकरे सेना तिघे एकत्र येवुन महाराष्ट्रामध्ये निवडणुक लढणार आहे. सध्या महाराष्ट्रात महाविकास आघाडी खुप झपाट्यानं पुढे जात आहे.लोकसभा निवडणुकीत ही इंडीया आघाडी.ने चांगली कामगीरी केली आहे लोकसभेचे विरोधीपक्ष नेते राहूलजी गांधी यांना कामगार कष्टकरी,शेतकरी, युवकांचा व जनसामान्य जनतेचा खुप मोठा प्रतिसाद मिळत आहे.

लोकसभेमध्ये इंडिया आघाडीला चांगले यश मिळाले आहे. आणि आता महाराष्ट्रात ही महाविकास आघाडीला विधान सभा निवडणुकीत मोठे यश जनतेकडून मिळणार आहे.काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना भाऊ पटोले,काँग्रेस निराधार निराश्रित व्यक्ती विकास विभागाचे प्रदेश अध्यक्ष राधिकाताई मखामले, खासदार सौ.रजनी ताई अशोक दादा पाटील,ओबीसी काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष भानुदास माळी साहेब,बीड जिल्हा काँग्रेस कमेटीचे जिल्हाध्यक्ष राजे साहेब देशमुख,यांच्या नेतृत्वाखाली बीड विधानसभा मतदार संघात महाविकास आघाडी जे उमेदवार देईन त्या चा एकजुटीने निवडणुकीत प्रचार करू अशी बीड जिल्हा काँग्रेस निराधार निराश्रित व्यक्ती विकास विभाग व बीड शहर काँग्रेस ओ बी सी विभाग वतीने बीड जिल्हा काँग्रेस निराधार निराश्रित व्यक्ती विकास विभागाचे जिल्हाध्यक्ष शेख मोहसीन बुर्हानोद्दिन, जिल्हा काँग्रेस निराधार निराश्रित व्यक्ती विकास विभागाचे जिल्हा उपाध्यक्ष शेख आमेर पाशा ,बीड शहर ओबीसी काँग्रेस चे अध्यक्ष सय्यद फरहान सय्यद शराफत, जिल्हा ,निराधार निराश्रित व्यक्ति विकास विभागाचे बीड तालुकाध्यक्ष शेख जहीर अमीर यांनी प्रसीधी पत्रकात म्हंटले आहे.

## पोलीस ठाण्यासमोर मांडला ठिय्या

आक्रमक: मनोज जरांगेंच्या विरोधात अपशब्द

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी



शहरात सोशल मीडियावर एकाने मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे यांच्या बद्दल अपशब्द वापरून कमेंट केल्याने शहरातील मराठा सेवकांचा तीनशे ये चारशे जणांचा जमाव सायंकाळी सात वाजता पोलीस ठाण्यासमोर येऊन रात्री साडेनऊ वाजेपर्यंत ठिय्या केला होता त्यामुळे शहरात गोंधळ उडाला होता

शहरात सोशल मीडियाच्या एका समूहावर एका ने वादग्रस्त पोस्ट करून संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या बद्दल अपशब्द वापरून पोस्ट केली त्यामुळे शहरातील मराठा तरुणांच्या भावना दुखावल्या गेल्याने सायंकाळी सात वाजता शहरातील मराठा तरुण आक्रमक झाले व सोयगाव पोलीस ठाण्याचे समोर घोषणा बाजी करून दोन ते अडीच तास ठिय्या केला व जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत न उठण्याचा निर्णय घेतला त्यामुळे रात्री उशिरापर्यंत सोयगाव पोलीस ठाण्यात त्या तरुणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती अखेर पोलिसांनी जमावाला शांत करत समजुत काढल्या मुळे रात्री साडे नऊ वाजता मराठा तरुणांनी ठिय्या माघारी घेतला होता..यावेळी पोलीस निरीक्षक पंकज बारवाल,उपनिरीक्षक रजाक शेख, जमादार राजु बर्डे,अजय कोळी,रविंद्र तायडे,गजानन दांडगे,दिलीप पवार आदींनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## राहुरी विधानसभा रासप लढवणार

पडघम: युवा नेते नानाभाऊ जुंधारेना उमेदवारी !



राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री महादेव जानकर यांनी महायुतीतुन बाहेर पडत आपल्या पक्षाचे स्वतंत्र उमेदवार उभे करणार असल्याचे जाहीर केले राहुरीतुन त्यांनी आपले विश्वासू शिलेदार नानाभाऊ जुंधारे यांना उमेदवारी दिली आहे राहुरी मतदारसंघात आता तिरंगी किंवा चौरंगी सामना रंगणार आहे राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यमान आमदार प्राजक्त तनपुरे भाजपचे शिवाजी कर्डिले यांच्यात काटे की टक्कर होणार असतांनाच आता मात्र रासपचा एन्ट्रीने सर्वच गणितं बदलणार आहे

राहुरी मतदारसंघात रासप ला मानणारा मोठा मतदार आहे राहुरी तालुक्यात धनगर समाजाची निर्णायक लोकसंख्या आहे मागील निवडणुकीत धनगर समाजाच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यमान आमदार प्राजक्त तनपुरे यांना एकमुखी पाठिंबा मिळाल्याने त्यांचा विजयाचा सोपा झाला होता आता मात्र रासपचा उमेदवार नानाभाऊ जुंधारे हे स्वतः चळवळीतील उमेदवार असल्याने लढत रोमहर्षक होणार आहे राहुरी मतदारसंघात आता जातीय समीकरणे बदलणार आहे गेल्या काही दिवसांपासून सामाजिक आरक्षणाचा मुद्दा गाजत असुन त्याचा ही परिणाम निवडणुकीत जाणवणार असल्याचे चित्र आहे रासपचा उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आल्याने राहुरी विधानसभा मतदारसंघात रोमहर्षक लढत होणार हे मात्र निश्चित

**खोळंबा** — फडवणीसांच्या हस्ते होणार होते लोकार्पण

# लोकार्पण सोहळा पुन्हा आचारसंहितेत अडकला

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेल्या आठ महिन्यापासून शहरात उभारण्यात आलेल्या सोयगाव पोलीस ठाण्याच्या इमारती च्या लोकार्पण सोहळ्यासाठी लोकसभा निवडणुकीपाठोपाठ आता विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेच्या बडग्यात या इमारतीच्या लोकार्पण सोहळा अडकला आहे त्यामुळे आता सोयगाव पोलीस ठाण्याच्या कारभार आता २०२५ या नवीन वर्षातच नवीन वास्तूमध्ये सुरू होण्याची शक्यता आहे

सोयगाव शहरात शासनाने पाच कोटी नऊ लक्ष रु निधी खर्चून पोलीस ठाण्याची भव्य वास्तू उभारली फेब्रुवारी२०२४ मध्ये या इमारतीच्या काम पूर्ण झाले होते परंतु लोकसभा निवडणुकीची आचारसंहितेमुळे हे लोकार्पण स्थगित झाले मात्र लोकसभा निवडणुकीच्या निकाला नंतर राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते (ता .०२) व ता.१५ आगस्ट हे दोन मुहूर्त लोकार्पण सोहळ्यासाठी काढण्यात आले परंतु या दिवशीही लोकार्पण झाले नाही त्यामुळे सप्टेंबरमध्ये जिल्हा पोलीस दलाला या वास्तू चा विसर पडल्याने आता ऑक्टोबर मध्ये पुन्हा विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता जाहीर झाल्या मुळे या भव्य वास्तू चा लोकार्पण स्थगित झाला आहे त्यामुळे आता सोयगाव पोलीस ठाण्याचे जानेवारी महिन्यात च लोकार्पण होईल त्यामुळे नवीन वर्षांत सोयगाव पोलीस ठाण्याच्या कारभार नवीन वास्तूत सुरु होईल.



सोयगाव पोलीस ठाण्याची नवीन वास्तू धूळखात पडून

### वास्तू धूळखात पडून

सोयगाव पोलीस ठाण्याचे पूर्णपणे काम झालेली ही भव्य वास्तु फरर्निचर सह तयार आहे. परंतु आचारसंहितेमुळे आता ही नवीन वास्तू धूळखात पडून आहे. वीज जोडणीसह फर्निचर साहित्य आदीने ही वास्तू उभी आहे परंतु लोकार्पण न झाल्याने या वास्तू ची आता पुन्हा तीन महिने साफसफाई करत राहून जानेवारी महिन्यात नवीन वर्षात लोकार्पण करण्यात येण्याची शक्यता आहे.

## धनराज अर्बन बँकेचा वर्धापन

सहकार:पाचव्या वर्षात यशस्वी वाटचाल



केज /पुण्यभूमी प्रतिनिधी तालुक्यातील कोरडेवाडी येथील धनराज अर्बन निधी मल्टिपर्पज बँकेचा वर्धापन दिन विजया दशमीच्या शुभमुहूर्तावर मुख्य कार्यालयात संपन्न झाला. सुरवातीला धनलक्ष्मीच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांनी बँकेचा गतवर्षाचा लेखाजोखा व वर्षभराची उलाढाल सभासदसमोर मांडली. तसेच संस्थेची पुढील वाटचाल कशी असेल या बद्दल माहिती दिली. अल्पावधीतच नावलौकिकास पात्र ठरलेली संस्था म्हणून अर्थव्यवस्थेत आपली वेगळी ओळख निर्माण केलेली संस्था म्हणून आज धनराज अर्बन सभासदांच्या विश्वासास पात्र ठरली आहे. आज संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त गावातील होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. व चहापणाने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष, सचिव, सर्व संचालक मंडळ, कर्मचारी वर्ग, सभासद व गावातील ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी


## श्रीलंकेचे अध्यक्ष दिसानायके येणार भारत भेटीवर

वृत्तसंस्था



**कोलंबो** : श्रीलंकेचे नवीन अध्यक्ष अनुरा कुमारा दिसानायके हे भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणावरून नोव्हेंबर महिन्यानंतर भारत भेटीवर येणार आहेत. श्रीलंकेचे परराष्ट्र मंत्री विजिथा हेरथ यांनी ही माहिती दिली. श्रीलंकेतल्या संसदीय निवडणुका झाल्यानंतर नवीन सरकार स्थापन केले जाईल. त्यानंतर अध्यक्ष दिसानायके यांच्या भारत भेटीचे वेळापत्रक निश्चित केले जाईल, असे त्यांनी सांगितले.

श्रीलंकेतल्या संसदीय निवडणुकीसाठी १४ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. ही निवडणूक १० महिने आगोदरच होणार आहे.

## तेलंगणात नौदल रडार स्थानकाच्या कार्यास प्रारंभ

### राजनाथ सिंह यांनी ठेवली आधारशिला

देशोन्नती वृत्तसंकलन



**हैदराबाद** : संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी तेलंगणाच्या दामागुंडम वन क्षेत्रात नौदलासाठी व्हीएलएफयूत रडार स्थानकाच्या कार्याचा शुभारंभ केला आहे. भारत सर्वांना जोडण्यावर विश्वास ठेवतो, तोडण्यावर नाही. याचमुळे आम्ही आमच्या मित्र असलेल्या शेजारी देशांना सोबत घेऊन वाटचाल करण्यासाठी शक्य ती सर्व पावले उचलत आहोत, असे उद्गार त्यांनी काढले आहेत. सागरी सुरक्षा एक सामूहिक प्रयत्न आहे. बाहेरील शक्तींना आमंत्रित केल्याने एकतेच्या प्रयत्नांना नुकसान होईल असे म्हणत संरक्षणमंत्र्यांनी भारतासोबत सागरी सीमा असलेल्या शेजारी देशांना संदेश दिला आहे.

## निवडणूक आम्ही जिंकू आणि सत्ता आणू

### राज ठाकरेंनी व्यक्त केला विश्वास

देशोन्नती वृत्तसंकलन

**मुंबई** : महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांचे बिगुल अखेर वाजले आहे. २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. याच पार्श्वभूमीवर आता सर्वच पक्षांनी तयारी सुरू केली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनेदेखील स्वबळावर निवडणुका लढवण्याचा निर्णय घेतला आहे. नुकतेच मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. तसेच राज ठाकरे यांनी लवकरच पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्याची घोषणाही केली. राज ठाकरे यांनी विधानसभेत निवडणुका लढवण्याची आपली भूमिका पुन्हा एकदा ठामपणे मांडली. मी निवडणुका जोरात लढवणार आहे. सभेत सहज म्हणून काहीही बोललो नाही. माझ्या भाषणांमधून लोकांचा विश्वास आणि आत्मविश्वास वाढावा, यासाठी मी मुद्दे मांडले आहेत.



**लखनौ** : उत्तर प्रदेशच्या बहराइच येथील हिंसेत मृत्युमुखी पडलेला २२ वर्षीय युवक रामगोपाल मिश्र याच्या परिवाराची मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी नुकतीच लखनौमध्ये भेट घेतली आहे. पीडित परिवाराने रामगोपालसोबत झालेल्या क्रौर्याचा तपशील मांडून दोषींवर कठोरातील कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## गोवा राज्यातून मान्सूनची माघार

### दोन दिवस यलो अलर्ट

वृत्तसंस्था



**पणजी** : मंगळवारी गोव्यासह संपूर्ण देशातून मान्सूनने माघार घेतली. राज्यात १ जून ते १५ ऑक्टोबरपर्यंत १७९.१९ इंच पावसाची नोंद झाली. हंगामात म्हणजेच १ जून ते ३० सप्टेंबरदरम्यान १७३.२६ इंच पावसाची नोंद झाली. तर १ ते १५ ऑक्टोबर दरम्यानच्या ५.९४ इंच पावसाची नोंद झाली. हवामान खात्याने बुधवारी राज्यात मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता व्यक्त करत पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे.

## इम्रान खानच्या पक्षाचे सरकारविरोधी आंदोलन मागे

वृत्तसंस्था

**इस्लामाबाद** : पाकिस्तानातील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या पाकिस्तान तेहरिक ए-इन्साफ पक्षाने सरकारविरोधात पुकारलेले आंदोलन मागे घेतले आहे. इम्रान खान यांची वैद्यकीय पथकाकडून तपासणी करू द्यायची आंदोलकांची अट सरकारने मान्य केली आणि सोमवारी रात्री सरकारने दिलेल्या आश्वासनानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले. इम्रान खान यांना कोणालाही भेटू न देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतल्यावर पीटीआयने हे आंदोलन पुकारले होते. इस्लामाबादमध्ये होणाऱ्या शांघाय सहकार्य संघटनेच्या पार्श्वभूमीवर राजधानीमध्येच निदर्शने करण्याचे पीटीआय पक्षाचे नियोजन होते.



### एस. जयशंकर यांनी पाकिस्तानला त्याच्याच भूमीवर फटकारले

## विश्वास नसेल तर काही नाही!

वृत्तसंस्था

**इस्लामाबादः** परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी आज शिखर परिषदेला संबोधित केले. परराष्ट्रमंत्री म्हणाले की, सर्व देशांना दहशतवाद, फुटीरतावाद आणि कट्टरतावाद टाळावा लागेल. परिषदेत पाकिस्तानचे नाव न घेता परराष्ट्रमंत्र्यांनी पाकिस्तानला दहशतवादाबद्दल खडसावले. जयशंकर म्हणाले की, चांगल्या नात्यासाठी विश्वास आवश्यक आहे. विश्वास नसेल तर काही नाही. त्याचवेळी जयशंकर यांनी पाकिस्तानशिवाय चीनलाही टोला लगावला. परराष्ट्रमंत्री जयशंकर म्हणाले की SCO सदस्य देशांमधील सहकार्य परस्पर आदर आणि सार्वभौम समानतेवर आधारित असले पाहिजे. सर्व देशांनी प्रादेशिक अखंडता आणि सार्वभौमत्व ओळखणे महत्त्वाचे आहे. त्याच वेळी, एकतर्फी अजेंडा पाळणाऱ्या देशांऐवजी वास्तविक भागीदारी तयार केली पाहिजे. परराष्ट्रमंत्र्यांनी सीपीईसीचे नाव न घेता त्याकडे बोट दाखवले. जयशंकर म्हणाले की, जर आपण जगातील निवडक पद्धतींचा पाठपुरावा केला, विशेषतः व्यापार आणि व्यापार मार्गांसाठी, तर SCO प्रगती करू शकणार नाही.

### दहशतवाद, फुटीरतावादाशी लढणे आवश्यक

परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी बैठकीत पुढे सांगितले की, एण्ध चे प्राथमिक ध्येय दहशतवाद, फुटीरतावाद आणि अतिरेकी यांचा सामना करणे हे असेल. सध्याच्या काळात हा मुद्दा खूप महत्त्वाचा आहे. या तिघांचा सामना करण्यासाठी, प्रामाणिक संवाद, विश्वास, चांगले शेजारी आणि एण्धचार्टरशी बांधिलकी आवश्यक आहे. बुधवारी सकाळी १०.३० वाजता ते इस्लामाबादमधील जिना कन्व्हेन्शन सेंटरमध्ये पोहोचले. येथे त्यांचे पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि उपपंतप्रधान इशाक दार यांनी स्वागत केले. एससीओची बैठक सकाळी ११ वाजता सुरू झाली आहे. यामध्ये एण्ध च्या व्यापार आणि आर्थिक अजेंड्यावर चर्चा झाली आहे.

## अन्नपदार्थांमध्ये थुंकी व युरीन मिसळल्यास तुरुंगवास

देशोन्नती वृत्तसंकलन



**लखनौ** : उत्तर प्रदेशमध्ये अन्नपदार्थांमध्ये थुंकी किंवा युरीन मिसळल्यास १० वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. योगी सरकार याबाबत कायदा तयार करत आहे. हा कायदा लागू झाल्यास, असा कायदा लागू करणारे यूपी हे देशातील पहिले राज्य असेल. नवीन कायद्यात ग्राहकांना हॉटेल्स आणि रेस्टॉरंटमध्ये काय पदार्थ दिले जात आहेत, हे विचारण्याचा अधिकारही असेल. खरे तर, सरकार उत्तर प्रदेश प्रिव्हेंशन ऑफ स्यूडो-अनफ्रेंडली अॅक्टिव्हिटीज आणि थुंकणे प्रतिबंधित अध्यादेश-२०२४ आणि यूपी प्रिव्हेंशन ऑफ कंटामिनेशन इन फूड (ग्राहक जाणून घेण्याचा अधिकार) अध्यादेश आणत आहे.

मुख्यमंत्री योगी यांनी मंगळवारी त्यांच्या निवासस्थानी गृह, कायदा व न्याय, संसदीय कामकाज आणि अन्न व रसद पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत या दोन्ही अध्यादेशांच्या मसुद्यावर विचारमंथन केले. सूत्रांनी दिलेल्या

### नवीन कायदा लवकरच!

माहितीनुसार, गृह विभाग, विधी व न्याय विभाग आणि अन्न व पुरवठा विभागाने दीर्घ प्रयत्नानंतर दोन्ही मसुदे तयार केले आहेत. चर्चेत ज्या मुद्यांवर एकमत होईल, त्यांचा समावेश करून मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाल्यानंतर अध्यादेश काढला जाईल. गेल्या काही महिन्यांत यूपीमध्ये दुकानांमध्ये ज्यूसमध्ये लघवी मिसळल्याच्या आणि खाद्यपदार्थांमध्ये थुंकल्याच्या घटना समोर आल्या आहेत. मात्र, याबाबत ठोस कायदा नसल्याने आरोपींवर कडक कारवाई होऊ शकली नाही.

अशा घटनांमुळे लोकांच्या धार्मिक भावना दुखावल्या जातात, असे कायदा विभागाच्या अधिकाऱ्यांचे मत आहे.

## केमिकल टाकी साफ करताना ५ कामगारांचा मृत्यू

**कच्छ** : कांडला येथील केमिकल फॅक्टरीत आज झालेल्या अपघातात ५ कामगारांचा मृत्यू झाला. केमिकल टाकीची साफसफाई सुरू असताना हा अपघात झाला. इमामी कंपनीत हा अपघात झाल्याचे सांगण्यात येत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, केमिकल टाकी साफ करताना गुदमरल्याने हे मृत्यू झाले आहेत.

## मी तुम्हाला मत दिले, लग्न लावून द्या

### तरुणाची आमदाराकडे अजब मागणी

देशोन्नती वृत्तसंकलन

**महोबा (उत्तर प्रदेश)** : यूपीच्या महोबा जिल्ह्यातील चरखारी विधानसभेचे आमदार बृजभूषण राजपूत हे एका ठिकाणी पेट्रोल भरण्यासाठी गेले होते. त्यावेळी या पेट्रोल पंपावर काम करणाऱ्या एका व्यक्तीने त्यांच्याकडे धाव घेतली. त्यामुळे आमदार बृजभूषण यांना वाटले की त्या व्यक्तीला कोणती तरी समस्या असेल ज्याची तक्रार करण्यासाठी त्यांनी धाव घेतली असेल; परंतु, या कर्मचाऱ्याने त्याचे लग्न न झाल्याची व्यथा आमदारासमोर मांडली. तर मी तुम्हाला मत दिले असून मी तुमचा मतदार आहे, ज्यामुळे आता तुम्ही माझे लग्न लावून द्या, अशी थेट मागणीच या कर्मचाऱ्याने केली.

## राष्ट्रपती मुर्मू यांना अल्जेरियात मानद डॉक्टरेट पदवी प्रदान

देशोन्नती वृत्तसंकलन



**अल्जियर (अल्जेरिया)** : भारत आणि अल्जेरियादरम्यान आर्थिक सहकार्य वाढवण्याचे आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केले आहे. अल्जेरियाचा वेगाने होत असलेला विकास आणि विस्तारत असलेल्या अर्थकारणामुळे विविध क्षेत्रांमध्ये नवनवीन संधी उपलब्ध होत आहेत, असेही त्यांनी म्हटले आहे. मुर्मू यांना आज अल्जियर्समधील सिदी अब्देल्लाह सायन्स अँड टेक्नॉलॉजी पोल युनिव्हर्सिटीने राज्यशास्त्रातील मानद डॉक्टरेट पदवी प्रदान केली.

भारत आणि अल्जेरियादरम्यान वार्षिक १.७ अब्ज डॉलरची व्यापारी उलाढाल होते मात्र व्यापाऱ्याच्या अनेक संधींचा अजून वापर केला जाऊ शकलेला नाही, असेही त्यांनी नमूद केले. भारत-अल्जेरिया आर्थिक मंचाला त्यांनी संबोधित केले. अल्जेरियाचे उच्च शिक्षण आणि वैज्ञानिक संशोधन मंत्री कमल बद्दरी यांनी मुर्मू यांना डॉक्टरेट प्रदान केली. अल्जेरियातील दौऱ्याच्या आपल्या अखेरच्या दिवशी राष्ट्रपती मुर्मू विविध कार्यक्रमांना उपस्थित राहिल्या. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज सी वॉटर डिसेलिनेशन प्रोजेक्ट साइट आणि रोमन साम्राज्याच्या अवशेषांना भेट दिली. राष्ट्रपती टिपाजाच्या विलायाकडे रवाना झाल्या आणि समाधीला भेट दिली. त्यांनी हम्मा गार्डनला भेट दिली आणि तेथे एक रोपटेदेखील लावले.

## कॅनडातील शीख समुदायात भीतीचे वातावरण

वृत्तसंस्था

**ओट्टावा** : हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येवरून भारत आणि कॅनडा यांच्यात निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रूडो यांच्या पूर्वीचा मित्रपक्ष असलेल्या न्यू डेमोक्रॅटिक पार्टीचे (एनडीपी) नेते जगमीतसिंग यांनी दावा केला की कॅनडाच्या शिखांमध्ये भीतीचे वातावरण आहे आणि कॅनडा सरकारने भारताच्या विरोधात कारवाई करावी, विशेषतः भारतावर राजकीय निर्बंध लादावेत अशी मागणी त्यांनी केली आहे.

आम्ही भारताच्या मुत्सद्दींना देशाबाहेर काढण्याच्या आजच्या निर्णयाचे समर्थन करतो आणि आम्ही कॅनडा सरकारला पुन्हा एकदा भारताविरुद्ध राजनैतिक निर्बंध लादण्याची, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नेटवर्कवर (आरएसएस) कॅनडात बंदी घालण्याची विनंती करतो आणि कॅनडाच्या भूमीवर संघटित गुन्हेगारी कृतीत भाग घेणाऱ्या कोणालाही कठोर शिक्षा केली जावी, अशी मागणी करतो असे जगमित सिंग यांनी म्हटले आहे.

### जगमित सिंग यांचा दावा



जगमीत सिंग यांनी असेही सांगितले की त्यांचा पक्ष रॉयल कॅनेडियन माउंटेड पोलिसद्वारे जारी केलेल्या माहितीबद्दल अत्यंत चिंतीत आहे, ज्यामध्ये म्हटले आहे की भारत सरकार गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईच्या सहकार्याने कॅनडाच्या भूमीवर दहशतवाद पसरवत आहे. ते म्हणाले की, कॅनडातील लोक विशेषतः कॅनडातील शीख समुदाय भीती, धमक्या, छळ आणि हिंसाचाराने वेढलेले आहेत. यामध्ये प्रामुख्याने खंडणी, हिंसाचार आणि निवडणूक हस्तक्षेप यांचा समावेश आहे. जगमीत सिंग यांनी पुढे आरोप केला की, कॅनडाकडे भारतीय अधिकाऱ्यांचा हरदीप सिंग निज्जर यांच्या हत्येशी संबंध असल्याचे विश्वसनीय पुरावे आहेत.

## तामिळनाडूतील लॅपटॉप चोर टोळीचा म्होरक्या जेरबंद

### कारच्या काचा फोडून पळवायचा लॅपटॉप

देशोन्नती वृत्तसंकलन

**पुणे** : शहरातील पार्किंग आणि रस्त्याच्याकडेला पार्क केलेल्या आलिशान कारच्या काचा फोडून लॅपटॉप चोरणारी तामिळनाडूतील टोळी कार्यरत होती. या टोळीच्या म्होरक्याला स्वागरेट पोलिसांनी बंगलोर येथून अटक केली आहे. त्याच्याकडून शहरातील तब्बल ११ लॅपटॉप चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहे. तो मुंबई पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्यांने राज्यात इतरही ठिकाणी असे गुन्हे केल्याचे समोर येत आहेत. त्याच्या दोन साथीदारांचा शोध सुरू आहे.



सुरेशकुमार पांडुरंगन सेरवई (५०,रा. श्रिरंगम, जि.त्रिचापल्ली, तामिळनाडू) असे आरोपीचे नाव आहे. त्याचा साथीदार सेंथील कुमार महालिंगन याच्यासह आणखी एकाचा शोध सुरू आहे. सुरेशकुमारच्या ताब्यातून दीड लाख रुपये किंमतीचे दोन लॅपटॉप हस्तगत करण्यात आले असल्याची माहिती पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील यांनी दिली. वरिष्ठ निरीक्षक युवराज नांद्रे यांनी सांगितले की, स्वागरेट पोलीस ठाण्यामध्ये फॉरच्युनर गाडीची काच फोडून एक लाख रुपये किंमतीचा लॅपटॉप आणि एअरपॉडची बॅग चोरुन नेली होती. या गुन्ह्याचा तपास करत असताना तपास पथकातील सहायक पोलीस निरीक्षक चांगदेव सजगणे व उपनिरीक्षक रवींद्र कस्पटे तसेच पोलीस अंमलदार प्रतिक लाहिगुडे, दिनेश भांदुर्गे आणि संदीप घुले यांच्या मदतीने तांत्रिक शोध घेतला असता, आरोपी हा बंगलोर येथे असल्याची खबर मिळाली.

## परप्रांतियांनी पारंपरिक व्यवसाय करणे गोव्यासाठी धोकादायक!

### मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांचे प्रतिपादन

**पणजी** : राज्यात स्थलांतरित तसेच बाहेरील लोक पारंपरिक व्यवसायात गुंतले आहेत. बाहेरच्या लोकांनी पारंपरिक व्यवसाय करायला सुरुवात केली तर गोवावासीयांच्या हातात कोणताही व्यवसाय उरणार नाही. जिल्हा पंचायत सदस्यांनी पायाभूत सुविधांच्या विकासाबरोबरच मानवाच्या विकासासाठी योगदान द्यावे, असे आवाहन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केले. उत्तर गोवा जिल्हा पंचायतीच्या नवीन कार्यालयाचे पणजीत उद्घाटन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक, आमदार प्रेमेंद शेट आदी मान्यवर उपस्थित होते. जिल्हा पंचायत सदस्यांनी प्रकल्प किंवा पायाभूत सुविधांकडे लक्ष देताना व्यक्तीच्या मानसिक विकासाचा विचार केला पाहिजे. गोव्यात पारंपरिक व्यवसाय कसे टिकतील, याचा विचार व्हायला हवा. पारंपरिक व्यवसायात गुंतलेल्यांना पाठिंबा द्यावा आणि इतरांना व्यवसायात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे,

## आप नेत्याची याचिका, यूपी सरकारला नोटीस

**नवी दिल्लीः** सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी आम आदमी पक्षाचे नेते सोमनाथ भारती यांच्या याचिकेवर उत्तर प्रदेश सरकारला नवी नोटीस जारी केली आहे. राज्यात रुग्णालये आणि शाळांच्या स्थितीवर अपमानास्पद टिप्पणी केल्याप्रकरणी सोमनाथ भारती विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



**पाकिस्तान** : एस. जयशंकर यांनी आज सकाळी सोशल मीडियावर एक फोटो शेअर केला. शेअर करण्यात आलेल्या फोटोमध्ये जयशंकर हे मॉर्निंग वॉक करताना दिसून येत आहेत. तसेच या फोटो सोबत त्यांनी एक कॅप्शन दिले आहे. त्यात त्यांनी, आपल्या उच्चायुक्तालयाच्या परिसरात भारत-पाकिस्तान संघाच्या सहकाऱ्यांसोबत मॉर्निंग वॉक.

## गत पाच वर्षात ७१३ कोटींचे ई चलान

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी मुंबई** : वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांमुळे अनेकांना आपले प्राण गमवावे लागल्याचे समोर आले आहे. गेल्या ५ वर्षांमध्ये तब्बल १ कोटी ४३ लाख ४४ हजार ७७८ ई चलानची ५५३ कोटी ६३ लाख ९५ हजार ६६२ रुपयांची वसुली करण्यात आली आहे. तसेच, गेल्या पावणे दोन वर्षांत

मुंबई वाहतूक विभागाने वाहनचालकांवर कारवाईसाठी ऑक्टोबर २०१६ मध्ये ई-चलान प्रणाली सुरू केली. मुंबई शहरात अनेक ठिकाणी वेगमर्यादा तपासणारे कॅमेरे बसविण्यात आले. तसेच, पावती पुस्तकाऐवजी पोलिसांच्या हाती मशीन देण्यात आली. या मशीनवर गाडीचा फोटो तसेच गाडी क्रमांक, परवाना क्रमांक आणि इतर माहिती टाकल्यावर ई-चलान तयार होते.

### दंड भरण्याचे वाहतूक पोलिसांचे आवाहन

दंड भरत नसलेल्या वाहनचालकांना नोटिसा जारी करण्यात येत आहेत. वाहतूक पोलिसांच्या वतीने नोटिसा जारी केलेल्या वाहनचालकांसाठी लोकअदालत ठेवण्यात आली आहे, पण तरीही दंड न भरणाऱ्या वाहनचालकांविरोधात सक्तीची कारवाई करण्याची मागणी वाहतूक पोलिसांनी आरटीओकडे केली आहे. जेव्हा संबंधित वाहनचालक हे आरटीओकडे येतील तेच यासंदर्भात कारवाई होऊ शकते. तसेच, दंड भरत नसलेल्या वाहनचालकांसाठी लोकअदालतच्या माध्यमातून वाहतूक पोलिसांनी थकित ई चलानद्वारे सव्वातेरा कोटींचा दंड वसूल केला आहे.

मुंबई वाहतूक पोलिसांनी वाहतुकीचे नियम न पाळणाऱ्यांना अंदाजे ९८ लाख २५ हजार ६०१ ई चालानद्वारे तब्बल ७१३ कोटी ५७ लाख ८७ हजार ९०० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. या वर्षी सप्टेंबरपर्यंत तब्बल ३३५ कोटींचा दंड ठोठावण्यात आला

### दंड थकविणाऱ्यांना नोटीस



## जर्मन राजदूतांना 'नजर' लागण्याचे टेन्शन

**नवी दिल्लीः** आपण जेव्हा नवी गाडी किंवा घर खरेदी करतो, तेव्हा सर्वात पहिला त्या गाडीची पूजा-अर्चा करतो. तसेच श्रीफळ म्हणजेच नारळ फोडून पेढ्यांचा नैवेद्य दाखवतो. या शिवाय आपल्या वाहनाला कोणाची नजर लागू नये यासाठी आपण गाडीला लिंबू-मिर्ची बांधतो. ही भारतीय परंपरा जेव्हा एखादा परदेशी व्यक्ती किंवा अधिकारी करू लागतो तेव्हा मात्र आपल्याला त्याचे आश्चर्य वाटते.

# ओबीसींनी ठरविले तर नक्कीच सक्सेस!

**रणधुमाळी** विस्थापित माधव निर्मळ यांच्या पाठीशी उभे रहा



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू असून राज्यात महाविकास आघाडी विरुद्ध महायुती यांच्यातच थेट सामना होणार असल्याचे दिसून येते. यामध्येच माजलगाव मतदार संघात काही समीकरण बदलून येण्याचे दिसू लागले आहेत. डोंगरपट्ट्यामध्ये माधव तात्या निर्मळ यांच्या नावाची जोरदार चर्चा चालू आहे ओबीसी नेता म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते आणि या ओबीसी नेत्याला यावेळी माजलगाव मतदारसंघातून आमदारच करायचं म्हणून डोंगरपट्ट्यात चर्चेला उद्यान आलेलं दिसू लागली आहे? यावेळी माधव तात्या निर्मळ यांनी लोकसभा निवडणुकीत माननीय आमदार पंकजाताई मुंडे यांचे एकनिष्ठपणे काम करून ओबीसी समाजामध्ये व डोंगरपट्ट्यात नाव लौकिकता नावलौकिकता मिळवली आहे. कुठल्याही पक्षाशी किंवा नेत्याशी गद्दारी न करता एकनिष्ठपणे आ.पंकजाताई मुंडे यांना खासदार हवे म्हणून माधव निर्मळ यांनी एकनिष्ठपणे माजलगाव मतदार संघामध्ये काम केलेले आहे. व बीड जिल्ह्याचे कृषिमंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे साहेब यांच्याशीही एकनिष्ठ पण एक काम करून आपले नाव लौकीकता मिळवली आहे यामुळे माजलगाव मतदार संघातील ओबीसी समाज कोणाच्याही भूलथापांना बळी न पडता माधव तात्या निर्मळ यांच्या पाठीशी उभा आहे? कुठल्याही कार्यकर्त्याला एकनिष्ठपणे बोलणारा कार्यकर्त्याला व बोलणारा हक्काचा माधव निर्मळ माजलगाव मतदार संघातील ओबीसीला मानणार आहे. त्यामुळे कोणाच्याही भूलथापांना बळी न पडता आमदार पंकजाताई मुंडे यांच्याशी एकनिष्ठपणे काम करणाऱ्या माधव तात्या निर्मळ यांना माजलगाव मतदार संघामध्ये प्रचंड मताधिक्य मिळणार असल्याची चर्चा माजलगाव मतदारसंघामधल्या ओबीसी मतदारांना आहे.

### ओबीसी समाज माधव निर्मळ यांच्या पाठीशी

आ. पंकजाताई मुंडे व कृषिमंत्री व पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे एकनिष्ठपणे काम करणारे माधव निर्मळ यांच्या पाठीशी माजलगाव व धारूर तालुक्यातील डोंगरपट्ट्यातील मतदार उभा आहे हा समाज कुठल्याही भूलथापांना बळी न पडता माधव तात्या निर्मळ यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील? धारूर तालुक्यातील डोंगरपट्ट्यात माधव तात्या निर्मळ यांचा बोलबाला चालू आहे माजलगाव मतदार संघातील सर्वसामान्य शेतकरी शेतमजुरांना भावी आमदार म्हणून माधव निर्मळ यांच्याकडे पाहतो आहे.

# राजश्री मुंडेंच्या गाडीला अपघात



पुणे पुण्यभूमी /प्रतिनिधी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे नेते तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आणि राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या पत्नी राजश्रीताई मुंडे यांचा कारचा अपघात झाला. पुणे-सोलापूर महामार्गावर पहाटेच्या सुमारास हा अपघात झाला. कार आणि ट्रॅव्हल बस यांच्यात धडक झाली. राजश्री मुंडे किरकोळ जखमी झाल्या मात्र त्या सुखरुप आहेत.

अपघाताची घटना सोरतापवाडी या ठिकाणी घडली, महामार्गावरून जाताना राजश्रीताई मुंडे यांची कार आणि ट्रॅव्हल बसची धडक झाली. पहाटेच्या सुमारास हा अपघात घडला.

या अपघातात राजश्री मुंडे किरकोळ जखमी झाल्या. घटनेनंतर त्यांना उपचारासाठी तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले.अपघातानंतर त्यांची प्रकृती तपासून त्यांना काही वेळातच रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. त्या मुंबईला सुख रूप पोहोचल्या आहेत.

# केजमध्ये गाठीभेटीवर दिला भर!

**रणधुमाळी:** पृथ्वीराज साठे लागले तयारीला



अंबाजोगाई/पुण्यभूमी प्रतिनिधी

विजयनगर,वैतागवाडी,अंधापुरी,सावरगावघाट,सात्रा,पोत्रा,कुंभारी,अंबिलवडगाव,बाळापूर,नेकनूर,येळंबघाट या गावांना भेटी देत नागरिकांशी संवाद साधला व येणाऱ्या विधानसभा या निवडणूकी मध्ये मला आशीर्वाद देऊन आपली सेवा करण्याची संधी द्यावी असे आव्हान केले.

यावेळी सोबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे केज तालुकाध्यक्ष शंकरराव जाधव,माजी पंचायत समिती सदस्य अनिल दादा जाधव,जिल्हाउपाध्यक्ष नवनाथराव देवगुडे,बाबू भाई,जिल्हाउपाध्यक्ष विनोद चाटे,कृषी चे तालुकाध्यक्ष प्रमोद जाधव,युवक जिल्हाउपाध्यक्ष वसंतराव हावळे,मगर सर,संजय शिंदे,अल्पसंख्याक तालुकाउपाध्यक्ष बाबा शेख,युवक तालुकाध्यक्ष कैलास चाळक,विवेक घोरपडे व ईतर मान्यवर उपस्थित होते.

# चाटगाव येथे ओबीसी मेळावा

**आवाहन:** प्रा.लक्ष्मण हाके,नवनाथ वाघमारेंची उपस्थिती





दिंद्रुड/पुण्यभूमी प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील चाटगाव येथे भव्य ओबीसी मेळाव्याचे आयोजन ओबीसी बचाव आंदोलनाचे प्रणेते प्रा.लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे, माधव निर्मळ यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी करण्यात आले आहे या मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन चाटगाव ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

ओबीसी समाजासाठी अहोरात्र तळमळीने झटणारे प्रा. लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे सह माजलगाव विधानसभा मतदारसंघातील ओबीसी नेते माधव निर्मळ यांच्या प्रमुख उपस्थितीत चाटगाव येथे शुक्रवारी सायंकाळी ५ वाजता भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात ओबीसी समाजाच्या आरक्षण मुद्द्यावर मार्गदर्शन करण्यात येणार असल्याची माहिती आयोजक संतोष केकान यांनी माध्यमांना दिली आहे. या मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन चाटगाव ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# माळेगाव यात्रेत ओढल्या बैलगाड्या!

**परंपरा:** भाविक-भक्तांची लक्षनिय उपस्थिती



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील माळेगाव येथे ग्रामदैवत तुळजाभवानी मातेची कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी यात्रा भरली होती. तर यात्रेत भक्ताने नागरिकांनी भरलेल्या १२ बैलगाड्या ओढल्या. या कार्यक्रमासाठी व दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी मंदिर परिसरात गर्दी झाली होती.माळेगाव येथे तुळजापूरच्या कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेचे ठाण असून देवीच्या मंदिरात नवरात्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. तर विजयादशमीपर्यंत विविध कार्यक्रम झाले. कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी तुळजाभवानी मातेची यात्रा भरली होती. बुधवारी पहाटे तुळजाभवानी मातेच्या मंदिरात भिषेक व अलंकार महापूजा केली. दर्शनासाठी आलेल्या भक्तांची मंदिर परिसरात गर्दी झाली होती. दुपारी अडीच वाजता १२ बैलगाड्या एकमेकांना दोरखंडाने बांधून त्यात छोटा गाडा ठेवून या १२ बैलगाड्या पाच दिवसापासून मंदिरात उपवास करीत बसलेले भक्त लक्ष्मण लोकरे यांनी ओढल्या. हा सोहळा पाहण्यासाठी बच्चेकंपनीसह महिला, तरुण, नागरिक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. तर यात्रेत खाद्यपदार्थांचे, सौंदर्य प्रसाधने व लहान मुलांच्या खेळणीचे स्टॉल लागले होते. रहाट पाळणे व इतर मनोरंजनाच्या साधनांचा आनंद यात्रेकरूंनी घेतला.

# सैनिक व माजी सैनिक कुटुंबीय संरक्षण समिती गठीत

**सदस्यपदी शिवप्रसाद माळवदे**



वडवणी/पुण्यभूमी प्रतिनिधी

गृह विभाग महाराष्ट्र शासन मुंबई यांच्या आदेशान्वये बीड जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या वतीने नुकतीच जिल्हास्तरीय सैनिक व माजी सैनिक कुटुंबीय संरक्षण समिती गठीत करण्यात आली असून या समितीच्या सदस्यपदी वडवणी येथील माजी सैनिक शिवप्रसाद लक्ष्मणराव माळवदे यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबध्दल त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, आपल्या देशाच्या सीमेवर हिमालय पर्वतासारखे भक्कम उभे राहून आपला भारत देश व सर्व भारतीयांना सुरक्षीत ठेवण्यासाठी जिवाची बाजी लावणाऱ्या सैनिक व माजी सैनिक यांच्या कुटुंबीयांना येणाऱ्या विविध अडीअडचणी सोडविण्यासाठी गृह विभाग महाराष्ट्र शासन मुंबई यांच्या आदेशान्वये बीड जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या वतीने नुकतीच बीड जिल्हास्तरीय सैनिक व माजी सैनिक कुटुंबीय संरक्षण समिती गठीत करण्यात आली असून या समितीच्या अध्यक्षपदी पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ हे असणार आहेत. तर सदस्यपदी वडवणी येथील माजी सैनिक शिवप्रसाद लक्ष्मणराव माळवदे यांच्यासह बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून एक अशा इतर अकरा माजी सैनिकांची या समितीत निवड करण्यात आली आहे. दरम्यान माजी सैनिक शिवप्रसाद लक्ष्मणराव माळवदे यांच्या या निवडीध्दल त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

# केजमधे पवार कोणाला तिकीट देणार?

**राजकीय:** मतदारसंघाची उत्सुकता शिगेला !



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज विधानसभा मतदारसंघात यावेळी चुरशीची लढत होण्याची शक्यता आहे परंतु भारतीय जनता पक्षाकडून विद्यमान आमदार नमिता मुंदडा यांची उमेदवारी फिक्स मानली जात असतानाच शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून कोणाला उमेदवारी मिळणार हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यांच्या पक्षाकडून माजी आमदार पृथ्वीराज साठे, माजी आमदार संगिता ठोंबरे, डॉ अंजलीताई घाडगे तसेच रमेश तात्या गालफाडे यांच्यासह बारा इच्छुकांनी मागणी केली आहे. या बारा पैकी उमेदवारी कोणाला मिळणार म्हणून या मतदारसंघात उत्सुकता शिगेला पोहोचली आहे परंतु खासदार बजरंग बप्पा सोनवणे हे देखील मौन धारण करून आहेत यामुळे नेमकी कोणाला लॉटरी लागणार याबाबत मोठा सस्पेन्स निर्माण झाला आहे. या दोन दिवसांमध्ये मनिषा गोकुळ जाधव यांच्याही नावाची शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून उमेदवारी मिळणार म्हणून जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे हे या मतदारसंघाचे भूमिपुत्र आहेत यामुळे या मतदारसंघात त्यांनी आपलीच शिफारस करावी असी अपेक्षा सर्वच इच्छुक उमेदवारांची आहे परंतु बाप्पांनी याबाबत सावध पवित्रा घेत मौन बाळगले आहे. हे मौन नेमकं सुटणार तरी कधी असाही सवाल उपस्थित केला जात आहे.

# जनतेने मला बहीण म्हणून स्वीकारावे !



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज मध्ये सध्या सर्वच इछूक उमेद्वारांचे गावोगावी संपर्क दौरे, गाटी भेटी चालू असून शरद पवार गटाच्या डॉ. अंजली घाडगे मतदारसंघातील प्रत्येक गावोगावी, वाड्या वस्त्यांवर जावून जनतेच्या घरा-घरात व मना-मनात आपले स्थान पक्के करताना दिसून येत आहेत आणि मतदार संघातील सर्व समाज त्यांना भरभरून प्रतिसाद ही देत आहे. - विधानसभा निवडणूक येत्या काही दिवसांत होणार असून याच पार्श्वभूमीवर डॉ. अंजली घाडगे यांनी केज मतदारसंघातून संपर्क दौरा नियोजनबद्ध सुरू केला असून शरदचंद्र पवार यांच्या पक्षाकडून निवडणूक लढवणार असल्याचे सांगितले. यावेळी केज मतदार संघातील जनतेने, समाजाने मला एक बहीण म्हणून सर्वांनी स्वीकारावे असे माध्यमांशी बोलतांना त्यांनी सांगितले आणि तशी भावनिक साद ही जनतेला त्यांनी घातली आहे. त्यांच्या या संपर्क दौत्यांना गावो गावी खेडोपाडी भरभरून प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

**धम्मदेसना** सांची बुद्ध विहारात वर्षावास समारोप

# गौतम बुद्धाने जगाला करुणा शिकविली!



माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा माजलगाव च्या वतीन सांची बुद्ध विहारात आषाढी पौर्णिमा ते अश्वीन पौर्णिमा या वर्षावास कालावधीत डॉ बाबासाहेब आंबेडकर लिखित भगवान बुद्ध आणी त्यांचा धम्म या पवित्र धम्म ग्रंथाचे वाचन करण्यात आले या ग्रंथ वाचनाचा समारोप अश्विन पौर्णिमा दि १७ऑक्टोंबर वार गुरुवार रोजी करण्यात आला या निमित्त धम्म प्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते त्यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन भारतीय बौद्ध महासभा बीड पुर्व चे जिल्हा अध्यक्ष आद बी बी धन्वे सर हे होते त्यांनी कालाम सुत्त मानव मुक्तीचा जाहीर नामा या विषयावर सखोल आसे मार्गदर्शन केले या प्रसंगी सदधम्म सेवा संघाचे अध्यक्ष सदाशिव भालेराव सर यांनी सुभेच्छा पर आपल मत व्यक्त केले या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा माजलगाव चे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते तर या कार्यक्रमा चे प्रस्ताविक भारतीय बौद्ध महासभा माजलगाव चे शहर अध्यक्ष एल आर मस्के सर यानी केले तर सुत्रसंचलन भारतीय बौद्ध महासभा माजलगाव चे सरचिटनीस सिद्धार्थ वक्ते यांनी केले तर आभार बौद्धाचार्य डी पी पोटभरेआप्पा यांनी मानले तर या वर्षावास कालावधीत तिन महिने ज्यांनी ग्रंथा वाचला ते ग्रंथवाच बौद्धाचार्य डी पी वाघमारे नाना यांनी ग्रंथाचे सेवटचे पान पाचुन प्रतिज्ञा घेऊन ग्रंथवाचनाचा समारोप करण्यात आला या कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभा जिल्हा बीड पुर्व च्या महिला सरचिटणीस शोभाताई भोजने,माजी जिल्हा संरक्षण उपाध्यक्ष गुलाब प्रधान,वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा कोषाध्यक्ष अंकुश आण्णा जाधव,जिल्हा सल्लागार धम्मानंद भाऊ साळवे ,क्राती सुर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष अशोक मगर, बहुजन समाज पार्टी चे अभिमन्यु साळवे,हरिभाऊ साळवे, बाबासाहेब सोळके, भारतीय बौद्ध महासभा माजलगाव च्या महिला अध्यक्षा वंदनाताई घनघाव यांच्या सह धम्म उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डी एस साळवे,नितीन डोंगरे,मोहन काकडे, बाबासाहेब घनघाव, दयानंद साळवे,प्रणव साळवे, गणपत भालेराव, मंदाताई साळवे,विषाखाताई वाघमारे,मंडोधरी खंदारे,शारदाताई तांगडे,आशाताई मोरे,अनुराधा साळवे,कांताबाई हिरवे,सह भारतीय बौद्ध महासभा तालुका पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले

# विधानसभा निवडणूक वातावरण तापले!

**प्रशासन :** आष्टीत ३ लाख ८३ हजार ३० मतदार




कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

आष्टी विधानसभा मतदारसंघात तीन लाख ८३ हजार ३० मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत, अशी माहिती सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा आष्टीच्या तहसीलदार वैशाली पाटील यांनी दिली. तहसील कार्यालयात आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.

आष्टी, पाटोदा व शिरूर कासार अशा तीन तालुक्यांचा समावेश असलेल्या आष्टी

मतदारसंघात दोन लाख तीन हजार ८३८ पुरुष व एक लाख ७९ हजार १९१ स्त्री मतदार असे एकूण ३ लाख ८३ हजार ३० मतदार मतदानाचा हक्क बजावतील. शहरी २२ वग्रामीण ४१८ अशी एकूण ४४० मतदान केंद्रे निर्माण केली आहेत. आष्टी तालुक्यातील २१, पाटोदा तालुक्यातील आठ तर शिरूर तालुक्यातील आठ अशी एकूण ३७ मतदान केंद्रे संवेदनशील आहेत. अंभोरा, दौलावडगाव, खडकत, पांढरवाडी फाटा, मानुर व सौताडा येथे एसएसटी, व्हीएसटी व एफएसटी पथकांची नियुक्ती केल्याचे तहसीलदार पाटील यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.